# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवी/मतदारयादी नाव नोंदणी/२०१७/ 3442 दिनांक :- 08 AUG 2017

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व शासकीय अशासकीय अनुदानित व खाजगी विना अनुदानित संस्था,

विद्यापीठ संलग्न अभ्यासक्रमाच्या संस्था,

पुणे जिल्हा.

विषय :- 'राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्था इत्यादी येथे प्रवेशाच्यवेळीच लोंकसभा,विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी विद्यार्थ्यांची नावे मतदार यादीमध्ये नावनोंदणी करण्याची कार्यवाही करण्याबाबत"

संदर्भ :- १.तंत्रशिक्षण संचालनालयाचे पृष्ठांकन क्र.१६/संकीर्ण/२०१७/शा १४३५ दिनांक ०६.०६.२०१७

२.उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६८३/१६/विशी-३ दिनांक १५.०५.२०१७

३.या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिविकापु/विवी/मतदारयादी नाव नोंदणी/२०१७/२३०५ दिनांक १७.०६.२०१७

४.जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे (निवडणूक शाखा) यांचे पत्र क्र.पीईई-३/एस आर./०६/२०१७ दि.२७.०७.२०१७

५.जिल्हाधिकारी कार्यालय ,पुणे (निवडणूक शाखा) यांचे पत्र क्र.पीईई-३/एस आर./०६/२०१७ दिनांक ०२.०८.२०१७

आपल्या देशाने लोकशाही पद्धत स्वीकारली असून १८ वर्षावरील व्यक्तींना मतदानाचा हक्क उपलब्ध करून देण्यात आला आहे. सबब १८ वर्षावरील सर्व व्यक्तींनी मतदार यादीमध्ये त्यांची नावे नोंदणे आवश्यक आहे व होणा-या प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदान करणे अपेक्षित आहे. मतदार यादीमध्ये अनेक त्रुटी असल्याच्या तक्रारी वारंवार प्राप्त होतात. सदर तक्रारी दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने शासन निर्णय निर्गमित केला आहे. राज्यातील सर्व विद्यापीठे ,महाविद्यालये,तंत्रशिक्षण संस्था यांनी प्रथम वर्षात प्रवेश घेणा-या सर्व मुला/मुलींकडून खालील आशयाचे प्रमाणपत्र/हमीपत्र घेण्याबाबत संदर्भाधीन पत्र क्र.३ नुसार सूचित करण्यात आले आहे.

" मी दिनांक ०१/०१/........ रोजी १८ वर्षाचा/वर्षाची झालो/ झाले आहे किंवा होणार आहे. १८ वर्ष पूर्ण झाल्याबरोबर मी माझे नाव मतदार यादीमध्ये नोंदवून घेणार आहे अशी मी प्रतिज्ञा करतो/ करते. यासाठी सोबत जोडलेला नमुना ६,७ ८ व ८अ व्यवस्थितपणे भरला आहे."

यासाठी आपल्या संस्थेतील एका प्राध्यापकाला या कामासाठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करावे. त्यांनी सर्व मुला / मुलींकडून आवश्यकतेप्रमाणे नमुना क्र.६,७,८ व ८अ गोळा करावेत.सदर नोडल अधिकारी यांनी वरील भरलेले कमीत कमी वर्षातून दोनवेळा संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करावेत व पोचपावती घ्यावी.

महाविद्यालयांमधून १८ ते २१ वयोगटातील अत्यंत कमी प्रमाणात मतदार नोंदणी झाल्याने मा.भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या उद्दिष्टानुसार वाय १८ ते २१ वर्ष वयोगटातील तरुण व पात्र मतदारांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मतदार नोंदणी होणे आवश्यक असल्याने मा.जिल्हाधिकारी सो.पुणे यांनी दिनांक २९.०७.२०१७ रोजी पुनश्च सर्व मतदार संघांमध्ये विशेष मतदार नोंदणी मोहीम राबविणेसाठी आदेश निर्गमित केलेले आहेत.याबाबत आपणास या कार्यालयाच्या दि.०१.०८.२०१७ रोजीच्या पत्रानुसार सूचित केलेलं आहे.

निवडणूक आयोगाने निर्धारित करून दिलेले उद्दिष्ट विशेषतः युवा मतदारांची नोंदणीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी मतदार नोंदणीचे काम या पुढेही चालू ठेवणे आवश्यक असल्याने तसेच राज्यातील महाविद्यालये उशिराने सुरु झाल्यामुळे तरुण मतदारांचे नाव मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी महाविद्यालयांकडून अद्याप अर्ज प्राप्त झालेले नसल्यामुळे सदर अर्ज प्राप्त करून घेऊन मतदार नोंदणी बाबतची कार्यवाही पूर्ण करून घेऊन नोंदणीबाबतची कार्यवाही देखील पूर्ण करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करून मा.प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी ,मुंबई यांनी सदरची मोहीम दि,३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत चालू

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in


ठेवण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.संदर्भिय पत्र क्र.५ अन्वये मा.जिल्हाधिकारी सदरची विशेष मोहीम महाविद्यालयामध्ये राबविण्याबाबत सूचित केलेलं आहे. तरी सदर दिवशी आपल्या संस्थेमधील विद्यार्थ्यांमधून पात्र मतदारांची नोंदणी करण्यात यावी. सोबत संदर्भिय पत्र क्र.५ व त्यासोबतचे मुख्य निवणूक अधिकारी,महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडून प्राप्त पत्राची छायांकित प्रत सोबत जोडत आहे.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत,

मा.उप जिल्हा निवडणूक अधिकारी.पुणे,जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे, जुनी जिल्हा परिषद बिल्डींग,पहिला मजला,पुणे

# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
## (निवडणुक शाखा)
### जुनी जिल्हा परिषद बिल्डींग, पहिला मजला, पुणे

फोन क्र. ०२०-२६०६१०११ ईमेल dydeopune1@gmail.com

निवडणूक/प्रथमप्राधान्य

जा.क्र. पीईई-३/एसआर/६/२०१७
दिनांक ०२/८/२०१७

प्रति,

१. मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
२. मा. रजिस्ट्रार, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे
३. मा. रजिस्ट्रार, भारती विद्यापीठ,पुणे
४. मा.रजिस्ट्रार, डी.वाय.पाटील,महाविद्यालय, पिंपरी,पुणे
५. मा.रजिस्ट्रार,टिळक महाविद्यालय,पुणे
६. मा.रजिस्ट्रार,कृषि महाविद्यालय,पुणे
७. मा.उप संचालक,शिक्षण विभाग,पुणे
८. मा.संचालक, तंत्रशिक्षण,पुणे
९. मा.संचालक,समाजकल्याण विभाग, पुणे
१०. मा.ग्रुप कमांडर,एनसीसी हेड क्वॉर्टर,सेनापती बापट रोड,पुणे
११. मा.समन्वय अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे

**विषय :-** मतदार यादीमध्ये वंचित मतदारांची विशेषत: प्रथमच मतदार म्हणून नोंदणीसाठी पात्र असलेल्या १८ ते २१ वयोगटातील तरुणांची नोंदणी करण्याची विशेष मोहिम दि. ३१.८.२०१७ पर्यंत मोहिम पुढे चालू ठेवण्याबाबत

**संदर्भ :-** १. मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. ईएलआर-२०१७/ प्र.क्र.३४८/१७/३३ दिनांक १ ऑगस्ट २०१७

२/- संदर्भीय पत्राची छायांकित प्रत सोबत पाठवित आहे त्याचे अवलोकन करावे.

उक्त पत्रान्वये आयोगाने निर्धारित करुन दिलेली उद्दिष्टे विशेषत: युवा मतदारांच्या नोंदणीची उद्दिष्टे गाठण्यासाठी यापुढेही काम करणे आवश्यक असल्याचे दिसून आलेले आहे. तसेच राज्यातील महाविदयालये उशीराने सुरु झाल्यामुळे तरुण मतदारांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी महाविदयालयाकडून अदयाप अर्ज प्राप्त झालेले नसल्यामुळे सदर अर्ज प्राप्त करुन घेऊन नोंदणीबाबतची कार्यवाही पूर्ण करुन घेऊन नोंदणी बाबतची कार्यवाही देखील पूर्ण करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन, मा. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी मुंबई यांनी सदरची मोहिम दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत चालू ठेवण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार १८ ते २१ वयोगटातील तरुण व पात्र मतदारांच्या नोंदणीची विशेष मोहिम महाविदयालयामध्ये दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत राबविणेत यावी. तसेच मा.भारत निवडणूक आयोग यांनी दिलेल्या उद्दिटाची पूर्ती करणेकामी **मा.जिल्हाधिकारी,पुणे यांनी सदरची विशेष मोहिम महाविदयालयामध्ये दि. १२/८/२०१७ रोजी राबविणेच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार आपले अधिनिस्त असलेल्या सर्व महाविदयालयातील प्राचार्यांना तशा सचूना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.**

मा.जिल्हाधिकारी पुणे यांचे
मान्यतेने

(मोनिका सिंह)
उप जिल्हा निवडणुक अधिकारी, पुणे

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
08 AUG 2017
आवक क्र. 7873

8/8/2017

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक : ईएलआर- २०१७/प्र.क्र.३४८/१७/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १.ऑगस्ट, २०१७.

प्रति,
जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

विषय : मतदार यादीमध्ये वंचित मतदारांची विशेषत: प्रथमच मतदार म्हणून नोंदणीसाठी पात्र असलेल्या १८ते २१ वयोगटातील तरुणांची नोंदणी करण्याची विशेष मोहिम . दि. ३१.८.२०१७ पर्यंत मोहिम पुढे चालू ठेवण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निरंतर पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादीमध्ये वंचित मतदारांची विशेषत: प्रथमच मतदार म्हणून नोंदणीसाठी पात्र असलेल्या १८ते २१ वयोगटातील तरुणांची मतदार यादीत नोंदणी करण्यासाठी दि. १ ते ३१ जुलै, २०१७ या कालावधीत विशेष मोहिम राबविण्यात आली आहे. या विशेष मोहिमेची आपण यशस्वीरित्या अंमलबजावणी केल्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर मतदार नोंदणीसाठी अर्ज प्राप्त झालेले आहेत.

२. असे असले तरी, आयोगाने निर्धारित करुन दिलेली उद्दिष्टे विशेषत: युवा मतदारांच्या नोंदणीची उद्दिष्टे गाठण्यासाठी यापुढेही काम करणे आवश्यक असल्याचे दिसून आले आहे. तसेच राज्यातील महाविद्यालये उशीराने सुरु झाल्यामुळे तरुण मतदारांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी महाविद्यालयांकडून अद्याप अर्ज प्राप्त झालेले नसल्यामुळे सदर अर्ज प्राप्त करुन घेऊन नोंदणीबाबतची कार्यवाही देखील पूर्ण करणे आवश्यक आहे. तेव्हा या सर्व बाबींचा विचार करता, विशेष मोहिम जरी दि. ३१ जुलै, २०१७ रोजी संपुष्टात आली असली तरी, या मोहिमे दरम्यान आपण ज्या उत्साहाने व मेहनतीने काम केले आहे त्याच उत्साहाने व मेहनतीने हे काम दि. ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत चालू ठेवण्यात यावे असे प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांचे निदेश आहेत. जेणेकरुन भारत निवडणूक आयोगाच्या "No Voter to be left behind" या घोषवाक्यानुसार राज्यातील प्रत्येक मतदाराची मतदार यादीमध्ये नोंदणी करण्याचे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल.

३. राष्ट्रीय मतदार याद्या शुध्दीकरण कार्यक्रमांतर्गत मतदार यादीतील डाटा बेसमध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार काही प्रमाणात सदर त्रुटींवर दुरुस्त्या झालेल्या आहेत. मात्र अद्याप काही त्रुटी शिल्लक आहेत तरी त्यावर कार्यवाही होऊन सदर त्रुटी या विशेष मोहिमेमध्ये दुरुस्ती करण्यात याव्यात तसेच मतदार यादीमध्ये ज्या मतदारांचे छायाचित्र कृष्ण धवल स्वरुपात आहेत अथवा छायाचित्र उपलब्ध नाही अशा मतदारांचे रंगीत छायाचित्र उपलब्ध करुन दुरुस्ती करण्यात यावी.

आपला,

(अ.ना. वळवी)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

प्रत माहितीस्तव अग्रेषित,
उप जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)